भयमुक्त ठाण्यासाठी सर्वपक्षीय जनमोर्चा

पूर्णेकर कुटुंबीयांचा सहभाग; महापालिका परिसराला पोलीस छावणीचे स्वरूप



ठाणे : शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे मानपाडा विभागप्रमुख प्रदीप ऊर्फ बाळू पूर्णेकर यांच्या हत्येच्या निषेधार्थ आणि शहरातील वाढत्या गुन्हेगारीकडे लक्ष वेधण्यासाठी शुक्रवारी ठाण्यात सर्वपक्षीय जनमोर्चा काढण्यात आला. 'भयमुक्त ठाणे'चा नारा देत विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी मोर्चात सहभागी झाले. पूर्णेकर यांच्या मारेकऱ्यांना तातडीने अटक करून कुटुंबीयांना न्याय देण्याची मागणी यावेळी करण्यात आली.

२९ सप्टेंबर रोजी पूर्णेकर यांची हत्या झाल्यानंतर शहरातील कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. या पार्श्वभूमीवर शुक्रवारी सायंकाळी साडेपाच वाजता ठाणे महापालिका मुख्यालयातून मोर्चाला सुरुवात झाली. पूर्णेकर यांचे पुत्र राम, भाऊ तथा माजी नगरसेवक जयनाथ पूर्णेकर आणि कुटुंबातील अन्य सदस्य मोर्चाच्या अग्रभागी होते.

शिवसेना ठाकरे गट, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष, काँग्रेस, महाराष्ट्र नवनिर्माण सेना, आम आदमी पक्ष आणि धर्मराज्य पक्षाचे पदाधिकारी सहभागी झाले. माजी खासदार राजन विचारे, आमदार जितेंद्र आव्हाड, केदार दिघे, विजय कदम, गुरुनाथ खोत, मनसेचे अविनाश जाधव, काँग्रेसचे राहुल पिंगळे, राजेश जाधव, विक्रांत चव्हाण आणि धर्मराज्य पक्षाचे राजन राजे यांच्यासह विविध पक्षांचे कार्यकर्ते उपस्थित होते.

'प्रदीप पूर्णेकर अमर रहें', 'पूर्णेकर कुटुंबाला न्याय मिळालाच पाहिजे' आणि 'आरोपींना अटक करा' अशा घोषणा देत कार्यकर्त्यांनी परिसर दणाणून सोडला. राष्ट्रध्वज आणि पूर्णेकर यांची छायाचित्रे असलेले फलकही हातात घेण्यात आले.

दरम्यान, राबोडी येथे पाच वर्षांपूर्वी हत्या झालेल्या मनसेचे पदाधिकारी जमील शेख यांच्या कुटुंबीयांनीही मोर्चात सहभाग घेतला. 'जस्टिस फॉर जमील शेख' असा संदेश असलेला फलक हातात घेऊन त्यांनी न्यायाची मागणी केली. या सहभागामुळे ठाण्यातील गुन्हेगारी आणि पीडित कुटुंबीयांना न्याय मिळण्याचा मुद्दा पुन्हा चर्चेत आला.

महापालिका परिसरात कडेकोट बंदोबस्त

मोर्चाच्या पार्श्वभूमीवर महापालिका मुख्यालय परिसरात मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. अतिरिक्त पोलीस आयुक्त अशोक दुधे आणि उपायुक्त प्रशांत कदम यांच्यासह वरिष्ठ पोलीस अधिकारी उपस्थित होते. त्यामुळे परिसराला पोलीस छावणीचे स्वरूप आले होते. महापालिका मुख्यालयातून निघालेला मोर्चा अल्मेडा रोड, एल.बी.एस. रोड, एल.जी. रोड, टेंभी नाका आणि सिव्हिल रुग्णालय मार्गे पॅव्हेलियन हॉटेल येथे समाप्त झाला. भाजपच्या काही स्थानिक कार्यकर्त्यांनीही मोर्चात सहभाग घेतला. पूर्णेकर हे आगरी समाजातील असल्याने त्यांना न्याय मिळावा, या भूमिकेतून सहभागी झाल्याचे त्यांनी सांगितले.

मतदार यादीतून लाखो नावे गायब – आदित्य ठाकरे

मुंबई : मतदार हा लोकशाहीचा केंद्रबिंदू असताना त्याचेच नाव मतदार यादीतून गायब होत असेल, तर निवडणूक प्रक्रियेच्या पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होणे स्वाभाविक आहे. मुंबईत सुमारे पाच लाख, तर राज्यात दहा लाख मतदारांच्या नावांबाबत विसंगती असल्याचा दावा करत शिवसेना ठाकरे गटाचे नेते आदित्य ठाकरे यांनी शुक्रवारी मतदार यादीतून लाखो नावे गायब झाल्याचा आरोप केला. मतदारांशी खेळणाऱ्या मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याच्या मागणीचा पुनरुच्चारही त्यांनी यावेळी केला.

मतदार यादीतील घोळ, लाखो मतदारांच्या नावांबाबतच्या विसंगती आणि नोंदणीतील त्रुटींचा मुद्दा उपस्थित करत आदित्य ठाकरे यांनी शुक्रवारी पत्रकार परिषदेत निवडणूक आयोगावर टीका केली. मतदार यादीतील त्रुटींचे सादरीकरण करताना निवडणूक आयोगाने वेगवेगळ्या दिवशी प्रसिद्ध केलेल्या मतदार याद्यांमधील आकडेवारीतील तफावत त्यांनी निदर्शनास आणून दिली. मतदारांची नावे नेमकी कशी गायब झाली, नोंदणी प्रक्रियेत एवढ्या मोठ्या त्रुटी कशा राहिल्या आणि या विसंगतीसाठी जबाबदार कोण, असे सवाल करत त्यांनी मतदार यादीतील कथित अनियमितेची निष्पक्ष चौकशी करून सर्व विसंगती दूर करण्याची मागणी केली.

महावितरणच्या ठाणे नागरी मंडळात रक्तदान शिबिर

ठाणे : महावितरणच्या 'सेवा संकल्प अभियाना'अंतर्गत ठाणे नागरी मंडळ कार्यालयात शुक्रवारी सिव्हिल हॉस्पिटल, ठाणे यांच्या सहकार्याने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात महावितरणच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांसह एकूण २६ रक्तदात्यांनी रक्तदान केले.

शिबिराचे उद्घाटन महावितरणच्या कोकण प्रादेशिक विभागाचे सहव्यवस्थापकीय संचालक दिलीप जगदाळे यांच्या हस्ते झाले. यावेळी भांडुप नागरी परिमंडळाचे प्रभारी मुख्य अभियंता दीपक पाटील, ठाणे नागरी मंडळाचे अधीक्षक अभियंता लक्ष्मण काकडे, विविध विभागांचे कार्यकारी अभियंते, अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.

महावितरणच्या माध्यमातून आपण जनसेवेचे कार्य करतो. त्याचबरोबर समाजाप्रती असलेली जबाबदारीही जपणे आवश्यक आहे.

जाहीर नोटीस

या नोटीसीद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, गाव मौजे चिखलडोंगरे, तलाठी सजा : चिखलडोंगरे, तालुका : वसई, जिल्हा पालघर, येथील खालील नमुद जमीन मिळकत

अ. क्र.	सर्वे हिस्सा नं.	क्षेत्रफळ (आर. चौ.मी. सें. मी)	आकारणी (रू. पै.)
१.	१४२/१	एकुण क्षेत्र १८.९०.०० पैकी खाते नं. ३४३१ मधील ८.१०.००	२४३.००
२.	१४२/९	५.६०.००	१६८.००
३.	१४२/१०	५.१०.००	१५३.००
४.	१४२/११	५.६०.००	१६८.००
५.	२८५/६/६	२२.९५.००	६८८.५०
६.	२८५/२१/१	७.१५.००	२१४.५०
७.	२८५/२२	३.५०.००	१०५.००
८.	२८५/२३	३.८०.००	११४.००
९.	२८५/२४	३.५०.००	१०५.००

सदर वर तक्त्यातील नमुद सर्व जमीन मिळकत ही मे. मंगलमुर्ती कन्स्ट्रक्शन कंपनी तर्फे भागीदार देवेंद्र खेमराज जैन हयांचे कायदेशिर मालकीची व कब्जेवहीवाटीची आहे. सदर वर वर्णन केलेल्या जमीन मिळकतीची मालकी निर्वेध (टायटल क्लियर) असणेबाबत माझे अशिलांतर्फे सदरची जाहीर नोटीस प्रसिद्ध करीत आहे. तसेच सदर जमीन मिळकतीची वसई-विरार शहर महानगरपालिकेकडुन बांधकाम परवानगी (डेव्हलपमेंट परमीशन) घेणेची आहे.

तरी सदरबाबत कोणासही काहीएक हरकत, वाद, दावा असल्यास व सदर मिळकतीवर कोणीही इसमाचा हक्क अधिकार किंवा हितसंबंध असेल वा सदर मिळकती संदर्भात कोणाही व्यक्तीचा वा संस्थेचा कुठल्याही प्रकारचा हक्क, अधिकार, वहीवाट, बक्षीस, कब्जा, बोजा किंवा हितसंबंध असल्यास सदरहु नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन **१४ दिवसांचे** आत सर्व लेखी पुराव्यानिशी खालील पत्यावर कळवावे, अन्यथा कोणाचाही काहीही हक्क, हितसंबंध नाही व असल्यास तो आपण सोडला आहे असे समजुन व्यवहार पुर्ण केला जाईल याची नोंद घ्यावी.

दिनांक : १०/१०/२०२६

अॅड. माधुरी अशोक पाटील,
वकील, उच्च न्यायालय, मुंबई.

ऑफीस : ३०९, प्रिता को-ऑपरेटीव्ह हौसिंग सोसायटी, बँक ऑफ बडोदासमोर, मनवेल पाडा रोड, विरार (पुर्व),तालुका: वसई, जिल्हा : पालघर, पिन:४०१३०५.

जाहीर सूचना

सूचित करण्यात येते की, आम्ही आमच्या अशिलांच्या वतीने व त्यांच्या सूचनांनुसार, श्री. सुबीर मोंगा आणि श्रीमती पूर्वी मोदी मोंगा, दोघेही सज्ञान, मुंबईचे भारतीय रहिवासी, ज्यांचा पत्ता ५०१, राम निवास, १४वा ए रोड, खार पश्चिम, मुंबई - ४०००५२ असा आहे, यांच्या खाली वर्णन केलेल्या मिळकतीसंबंधीच्या मालकी हक्काची तपासणी करीत आहोत:

सदर मिळकतीमध्ये किंवा तिच्या कोणत्याही भागामध्ये आणि/किंवा तिच्याशी संबंधित फ्लोअर स्पेस इंडेक्स/फ्लोअर एरिया रेशो, हस्तांतरणीय विकास हक्क आणि विकास क्षमता किंवा त्यातील कोणत्याही भागामध्ये आणि/किंवा विकास हक्कांमध्ये आणि/किंवा सदर मिळकतीच्या किंवा तिच्या कोणत्याही भागाच्या कब्जा, वापर, अधिभोग किंवा उपभोगामध्ये आणि/किंवा सदर मिळकतीसंबंधीच्या कोणत्याही मालकी हक्काच्या दस्तऐवजांमध्ये, विक्री, अभिहस्तांतरण, हस्तांतरण, वाटप, अदलाबदल, बक्षीस, अभिहस्तांकन, गहाण, धारणाधिकार, बोजा, न्यास, वक्फ, भाडेपट्टा, उपभाडेपट्टा, भाडेकरार, उपभाडेकरार, संरक्षित भाडेकरार परवाना, अधिभोग हक्क, देखभालकर्त्याचे हक्क, बोजा, वारसा, मृत्युपत्राद्वारे दिलेली देणगी, उत्तराधिकार, कौटुंबिक व्यवस्था/तडजोड, मृत्युपत्र, मृत्युपत्रीय दस्तऐवज, प्रोबेट, प्रशासनपत्रे, सुखाधिकार, निर्वाहभत्ता, विकास हक्क, संयुक्त विकास, उपविकास, प्रकल्प व्यवस्थापन, संयुक्त उपक्रम, सहयोग किंवा कोणत्याही न्यायालयाच्या कोणत्याही आदेश किंवा न्यायनिर्णयाद्वारे (अंतरिम किंवा अंतिम) किंवा हुकूमनाम्याद्वारे किंवा कोणत्याही करार/कंत्राटाअंतर्गत किंवा अन्य कोणत्याही प्रकारे कोणताही हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, लाभ, दावा किंवा मागणी असलेल्या सर्व व्यक्तींना याद्वारे विनंती करण्यात येते की, त्यांनी अशा हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, लाभ, दावा किंवा मागणीची माहिती, त्याच्या समर्थनार्थ दस्तऐवजी पुराव्यांच्या नोटरीकडून प्रमाणित केलेल्या सत्य प्रतींसह, खाली सही करणाऱ्यांना मे. लॉ विंग्स, ॲडव्होकेट्स ॲंड सॉलिसिटर्स, ए-४०१(ई), जसवंती अलाइड बिझनेस सेंटर, ए विंग, चौथा मजला, रामचंद्र लेन, काचपाडा, मालाड पश्चिम, मुंबई - ४०००६४ येथे ही सूचना प्रकाशित झाल्याच्या दिनांकापासून ७ (सात) दिवसांच्या आत लेखी कळवावी. अन्यथा अशा व्यक्तीचा किंवा व्यक्तींचा कथित हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, लाभ, दावा किंवा मागणी, असल्यास, त्याग केलेली आणि/किंवा सोडून दिलेली मानली जाईल.

दिनांक: ७ ऑक्टोबर २०२६

वर वर्णन केलेल्या मिळकतीचे संदर्भित परिशिष्ट

सर्व तो भाग व विभाग म्हणजेच अरिस्टो सॅफायर को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लिमिटेडमधील ''अरिस्टो सॅफायर'' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या इमारतीच्या ए विंगमधील ५व्या मजल्यावरील फ्लॅट क्र. ए-५०१, ज्याचे चटई क्षेत्र ६१.२५ चौ. मीटर आणि नीच क्षेत्राचे चटई क्षेत्र ८.९६ चौ. मीटर असून, एकूण क्षेत्र ७०.२१ चौ. मीटर आहे. सदर इमारत गाव वांद्रे येथील सी.टी.एस. क्र. एच/५०१ ए शी संबंधित प्लॉट क्र. ए वर स्थित असून, हेप्टुल्ला पार्क, २७ हसनाबाद लेन, सांताक्रूझ (पश्चिम), मुंबई - ४०००५४ येथे आहे.

सही/-
मे. लॉ विंग्स
ॲंडव्होकेट्स ॲंड सॉलिसिटर्स

युनियन बँक ऑफ इंडिया (विले पार्ले पश्चिम शाखा)
शिव शक्ती, ११, विठ्ठल नगर को-ऑप. हाऊ. सोसा., १०वा रोड, जे.व्ही.पी.डी. स्कीम, विले पार्ले पश्चिम, मुंबई- ४०० ०४९
ई-मेल आयडी: ubin0540811@unionbankofindia.bank.in

(जोडपत्र-IV-ए)

(नियम ८(६) साठी परंतुके पहा)

स्थावर मिळकतींच्या विक्रीकरिता विक्री सूचना

सिक्युरिटायझेशन ॲंण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेटस् ॲंण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ सहवाचता सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ च्या नियम ८(६) च्या तरतुदींच्या अंतर्गत स्थावर मत्तेच्या विक्रीकरिता ई-लिलाव विक्री सूचना.

सर्वसामान्य जनता आणि विशेषतः कर्जदार आणि हमीदार यांना सूचना याद्वारे देण्यात येते की खालील वर्णिलेली स्थावर मिळकत तारण धनकोंकडे गहाण/प्रभारित आहे. जिचा **अन्वयीक** कब्जा तारण धनको, युनियन बँक ऑफ इंडियाला थकीत **०८/०१/२०२६ रोजीस रु. १,४८,७१,३११/-** आणि त्यावरील व्याज आणि प्रभाराच्या वसुलीकरिता **२८/१०/२०२६** रोजी ''जे आहे जेथे आहे'', ''जे आहे जसे आहे'' आणि ''जे काहि आहे तेथे आहे'' तत्त्वाने विकण्यात येणार आहे.

राखीव किंमत **रु. १,९४,००,०००.०० (रुपये एक कोटी चौऱ्याण्णव लाख मात्र)** राहील आणि इसारा अनामत रक्कम **रु. १९,४०,०००/- (रुपये एकोणीस लाख चाळीस हजार मात्र)** राहील.

स्थावर मिळकतीचे वर्णन

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या हद्दीतील आणि मुंबईचा जिल्हा आणि मुंबई उपनगरचा उपजिल्हा नोंदणीतील गाव आंबिवली, तालुका अंधेरी, जिल्हा मुंबई उपनगर येथे स्थित, वसलेल्या आणि अशा सर्व्हे क्र. १३५ (भाग) आणि सीटीएस क्र. ८३५ (भाग), ८३८ (भाग) आणि ८३९ (भाग) धारक जमिनीच्या सर्व त्या भाग आणि विभागावर बांधलेल्या आझाद नगर, वीरा देसाई रोड लगत, अंधेरी (प.), मुंबई ४०० ०५३ येथे स्थित ''वेंगुर्लेकर्स चैत्र''अशा ज्ञात इमारतीमधील मोजमापित ६२६.५७ चौ.फू. म्हणजेच ५८.२१ चौ. मी. ऱ्ल्या मजल्यावरील फ्लॅट क्र. १०२ अशी स्थावर मिळकत.

भारांची सूची : प्राधिकृत अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार भार नाहीत.

विक्रीच्या तपशिलवार अटी आणि शर्तींकरिता खाली दिलेल्या लिंकचा संदर्भ घ्यावा
https://www.unionbankofindia.bank.in/auction-property/viewauction-property.aspx
ती येथे जोडलेली आहे.

ठिकाण : मुंबई
दिनांक : ०६/१०/२०२६

सही/-
प्राधिकृत अधिकारी
युनियन बँक ऑफ इंडिया करिता

जोडपत्र: विक्रीच्या शर्ती

बँक ऑफ महाराष्ट्र
Bank of Maharashtra
A GOVT. OF INDIA UNDERTAKING
एक परिवार एक बैंक

ॲसेट रिकव्हरी शाखा :
जनमंगल, ४था मजला, ४५/४७,
मुंबई समाचार मार्ग, फोर्ट,
मुंबई-४०००२३ **दूरध्वनी :** ८६५७४७२९४६;
ई-मेल : bom1450@mahabank.co.in/
brmgr1450@mahabank.co.in

कब्जा सूचना
(स्थावर मिळकतीकरिता) [नियम ८(१)]

ज्याअर्थी, निम्नस्वाक्षरीकारांनी **बँक ऑफ महाराष्ट्र,** प्राधिकृत अधिकारी म्हणून, सिक्युरिटायझेशन ॲंण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स ॲंण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अंतर्गत आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ च्या नियम ८ सह वाचण्यात येणाऱ्या कलम १३(४) आणि १३(१२) अन्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, सदर अधिनियमाच्या कलम १३(२) अंतर्गत दिनांक **१०.०९.२०२५** रोजी मागणी सूचना जारी केली होती आणि कर्जदार **मे. साई एजन्सी, मालक श्री. हिरालाल दयाराम तुरशानी, सौ. मीना हीरालाल तुरशानी (हमीदार)** यांना सदर सूचनेत नमूद केलेली एकूण रक्कम, पहिल्या सुविधेसाठी रु. **१,८०,५२,३३०.६५/- अधिक दिनांक ०१.०९.२०२५ पासून वार्षिक १०.४५% दराने लागू न केलेले व्याज आणि दुसऱ्या सुविधेसाठी रु. २०,४६,६४२.००/- अधिक दिनांक ०१.०९.२०२५ पासून वार्षिक ८.२५%** दराने लागू न केलेले व्याज, तसेच झालेला/होणारा आनुषंगिक खर्च, या मान्य दराने लागू न केलेले व्याज आणि दंडात्मक शुल्क सदर सूचना प्राप्त झाल्याच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत परतफेड करण्यास सांगितले होते.

कर्जदार सदर रकमेची परतफेड करण्यात कसूर केल्यामुळे, विशेषतः वर नमूद केलेल्या कर्जदारांना व हमीदारांना आणि सर्वसाधारण जनतेला याद्वारे सूचित करण्यात येते की, **बँक ऑफ महाराष्ट्र**च्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी सदर ॲक्टच्या कलम १३(४) मधील तरतुदींनुसार प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून, खाली वर्णन केलेल्या मालमत्तेचा दिनांक **०९.१०.२०२६** रोजी **प्रत्यक्ष कब्जा** घेतला आहे.

विशेषतः कर्जदारास, हमीदारास आणि सर्वसाधारण जनतेस याद्वारे सावध करण्यात येते की, त्यांनी सदर मालमत्तेबाबत कोणताही व्यवहार करू नये आणि सदर मालमत्तेबाबत केलेला कोणताही व्यवहार **बँक ऑफ महाराष्ट्र**च्या या मान्य दराने लागू न केलेले व्याज व दंडात्मक शुल्क, त्यावरील आनुषंगिक खर्च, व्यय आणि शुल्क यांसाठी असलेल्या प्रभाराच्या अधीन राहील. तारण मत्तांच्या विमोचनाकरिता उपलब्ध वेळेत ॲक्टचे कलम १३ चे उप-कलम (८) च्या तरतुदींनुसार कर्जदाराचे लक्ष वेधण्यात येत आहे.

स्थावर मिळकतीचे वर्णन

अतिरिक्त तारण :- फ्लॅट क्र. २०३, २रा मजला, रीजन्सी गार्डन, सपना गार्डनजवळ, उल्हासनगर-३, ठाणे, उल्हासनगर, महाराष्ट्र ४२१००२.

सही/-
दिनांक : ०९.१०.२०२६ **सहाय्यक महाव्यवस्थापक आणि प्राधिकृत अधिकारी**
ठिकाण : उल्हासनगर, ठाणे **ॲसेट रिकव्हरी शाखा**

फॉर्म बी
जाहीर उद्घोषणा
(इन्सॉल्व्हन्सी ॲंड बँकरप्टसी बोर्ड ऑफ इंडिया (लिक्विडेशन प्रोसेस) रेग्युलेशन्स, २०१६ च्या रेग्युलेशन १२)

मनोमय व्हेंचर्स प्रायव्हेट लिमिटेड (पूर्वीची ओंकार व्हेंचर्स प्रायव्हेट लिमिटेड) च्या स्टेकहोल्डर्सच्या माहितीसाठी

अ. क्र.	तपशील	तपशील
१	कॉर्पोरेट कर्जदाराचे नाव	**मनोमय व्हेंचर्स प्रायव्हेट लिमिटेड (पूर्वीची ओंकार व्हेंचर्स प्रायव्हेट लिमिटेड)**
२	कॉर्पोरेट कर्जदाराच्या स्थापनेची तारीख	११ जानेवारी, २०१३
३	कॉर्पोरेट कर्जदार ज्या अंतर्गत स्थापित/नोंदणीकृत आहे ते प्राधिकरण	कंपनी अधिनियम, १९५६
४	कॉर्पोरेट कर्जदाराचा कॉर्पोरेट आयडेन्टिटी क्र.	यु७०१०२एमएच२०१३पीटीसी२३९५६८
५	कॉर्पोरेट कर्जदाराचे नोंदणीकृत कार्यालय व मुख्य कार्यालय (असल्यास) ह्यांचा पत्ता	पॉप्युलर मेटल वर्क्स, ताल्या टोपे मार्ग, जोगळेकरवाडी सायन फिश मार्केट, सायन (पूर्व), मुंबई, महाराष्ट्र, ४०००२२
६	रिझॉल्यूशन प्रोसेस बंद होण्याची तारीख	२९ सप्टेंबर, २०२६
७	कॉर्पोरेट कर्जदाराची समापन सुरू होण्याची तारीख	२९ सप्टेंबर, २०२६ (आदेशाची प्रत ७ ऑक्टोबर, २०२६ रोजी प्राप्त)
८	समापक म्हणून कृती करणारे इन्सॉल्व्हन्सी प्रोफेशनलचे नाव आणि नोंदणीकृत क्रमांक	जयकुमार पेसुमल अरलानी, नोंदणी क्र.: आयबीबीआय/आयपीए-००१/आयपी-पी०१५८२/२०१८-२०१९/१२४४३
९	मंडळात नोंदणीकृत असलेला समापकाचा पत्ता आणि इमेल	बी/३०१, बिल्डिंग क्र. ११२, बी विंग, शिव शरण सीएचएसएल, टिळकनगर, चेंबूर (प.), वृंदावन कॉलनीच्या मागे, मुंबई, महाराष्ट्र-४०००८९; ई-मेल: arlanijay@gmail.com
१०	समापकासह पत्रव्यवहार करण्यासाठी वापरण्याचा पत्ता आणि इमेल	बी/३०१, बिल्डिंग क्र. ११२, बी विंग, शिव शरण सीएचएसएल, टिळकनगर, चेंबूर (प.), वृंदावन कॉलनीच्या मागे, मुंबई, महाराष्ट्र-४०००८९; ई-मेल: irp.omkar@gmail.com

याद्वारे सूचना देण्यात येते की, सन्माननिय राष्ट्रीय कंपनी विधी न्यायाधिकरण, मुंबई खंडपीठ यांनी दिनांक **२९ सप्टेंबर, २०२६ रोजी मनोमय व्हेंचर्स प्रायव्हेट लिमिटेड (पूर्वीची ओंकार व्हेंचर्स प्रायव्हेट लिमिटेड)** च्या समापनाला सुरुवात करण्याचे आदेश दिले आहेत.

सही/-
समापकाचे नाव आणि सही:
जयकुमार पेसुमल अरलानी
मनोमय व्हेंचर्स प्रायव्हेट समापक
(पूर्वीची ओंकार व्हेंचर्स प्रायव्हेट लिमिटेड) चे समापक
नोंदणी क्र.: आयबीबीआय/आयपीए-००१/आयपी-पी०१५८२/२०१८-२०१९/१२४४३
दिनांक आणि ठिकाण: मुंबई; १०.१०.२०२६ एएफए दिनांक ३१/१२/२०२६ पर्यंत वैध

केनरा बँक Canara Bank
भारत सरकार का उद्यम
A Govt. of India Undertaking
सिंडिकेट Syndicate

लोअर परळ शाखा : युनिट क्र. १, तळमजला, कमला मिल्स कंपाऊंड, टाइम्स टॉवर, एस. बी. रोड, लोअर परळ (प.), मुंबई-४०० ०१३; **ईमेल:** cb15538@canarabank.com.

विक्री सूचना

सिक्युरिटायझेशन ॲंण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेटस् ॲंण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ सहवाचता सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ च्या नियम ८(६) च्या तरतुदींन्वये स्थावर मिळकतींच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना.

सर्वसामान्य जनता आणि विशेषतः कर्जदार आणि हमीदार यांना **सूचना** देण्यात येते की खालील वर्णिलेली स्थावर मिळकत तारण धनकोकडे गहाण/प्रभारित आहे, जिचा **अन्वयीक कब्जा केनरा बँकेच्या मुंबई लोअर परळ शाखेच्या** प्राधिकृत अधिकाऱ्यांनी घेतला आहे, ती कर्जदार **अशफाक गुलाम पांड्ये** यांचेकडुन **केनरा बँकेच्या मुंबई लोअर परळ शाखेला** थकीत वाद खर्च आणि इतर प्रभारासह **०३.०६.२०२६** रोजीसची **रु. १८,७६,८४६.८६ (रुपये अठरा लाख शहात्तर हजार आठशे शेहेचाळीस आणि पैसे शहाऐंशी मात्र)** अधिक ०४.०६.२०२६ पासूनचे त्यावरील पुढील व्याजाच्या वसुलीकरिता **१२.११.२०२६** रोजी ''**जे आहे जेथे आहे**'' ''**जे आहे जसे आहे**'' आणि ''**जे काही आहे तेथे आहे**'' तत्वाने विकण्यात येणार आहे.

स्थावर मिळकतीचा तपशिल, राखीव किंमत आणि इअर रक्कम खालीलप्रमाणे : **(रक्कम रु.त)**

अ. क्र.	मिळकतीचा तपशील	राखीव किंमत	इअर
१.	**खालापूर नगरपरिषदेच्या** हद्दीतील रायगडचा जिल्हा आणि उपजिल्हा नोंदणीतील गाव खालापूर, तालुका आणि जिल्हा रायगड येथे स्थित, वसलेल्या आणि अशा सर्व्हे क्र. २/१, २/३, २/४ ए, बी, सी आणि २/६, प्लॉट क्र. १५, १६, १८ ते २१, सिटी सर्व्हे क्र. ७१९, ७२३, ७२४, ७२५, ७२६ धारक जमिनीच्या सर्व त्या भाग आणि विभागावर बांधलेल्या ''**ड्रीम पार्क**'' अशा ज्ञात इमारतीमधील मोजमापित ३०.७७० चौ.मी. (चटई क्षेत्र) + मोजमापित ४.४४५ चौ.मी. (टेरेस क्षेत्र), डी-विंगच्या ३ऱ्या मजल्यावरील फ्लॅट क्र. ३०३. **नामाधिकार धारकाचे नाव :** अशफाक गुलाम पांडेय. **सीईआरएसएआय सिक्युरिटी इंटरेस्ट आयडी :** ४०००५७४८४१४६	रू. १२,६०,०००/-	रू. १,२६,०००/-

इसारा अनामत रक्कम **१२.११.२०२६** रोजी किंवा पूर्वी **स. ९.३० वा.** पर्यंत जमा करणे आवश्यक आहे.

मिळकतीचे निरिक्षण **०६.११.२०२६ रोजी स. ११.०० ते सायं. ४.०० वा.** दरम्यान **केनरा बँक, मुंबई, लोअर परळ शाखेच्या** प्राधिकृत अधिकाऱ्यांकडे वेळ ठरवुन करता येईल.

बँकेच्या माहितीनुसार तेथे मिळकतीवर बोजा नाही.

विक्रीच्या तपशीलवार अटी आणि शर्तींकरिता कृपया कॉमन वेबपोर्टल- **मे. पीएसबी अलायन्स (बँकनेट)** मध्ये दिलेल्या ''ई-लिलाव'' लिंकचा संदर्भ घ्यावा, **संपर्क क्र.** ८२९१२२०२२०, ७०४६६१२३४५, ६३५४९१०१७२, ९८९२२१९८४८, ८१६०२०५०५१, **ई-मेल : support.BAANKNET@psballiance.com,/ https://baanknet.com** किंवा **केनरा बँकेची वेबसाईट www.canarabank.com** किंवा कोणत्याही कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत व्यवस्थापक, **केनरा बँक, मुंबई लोअर परळ शाखा,** ९९८६६८२५६९ / ९९८७६०३३३५ यांना संपर्क करु शकता.

सही/-
दिनांक : ०५.१०.२०२६ प्राधिकृत अधिकारी
ठिकाण : मुंबई **केनरा बँक**

---

sarvagram aspire. grow. prosper.

सर्वग्राम फिनकेअर प्रायव्हेट लिमिटेड
नोंद. कार्यालय: कार्यालय क्र. २२, ४था मजला, प्राईमरोझ मॉल, बाणेर रोड, बाणेर गाव, हवेली, पुणे-४११०४५.

जोडपत्र IV (नियम-८(१))
प्रत्यक्ष कब्जा सूचना (स्थावर मिळकतीकरिता)

ज्याअर्थी, निम्नस्वाक्षरीकारांनी खालील नमूद तारण धनको चे प्राधिकृत अधिकारी या नात्याने सिक्युरिटायझेशन ॲंड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेट्स ॲंड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट (ॲक्ट), २००२ अन्वये आणि कलम १३(२) सहवाचता (नियम ३) अन्वये सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून मागणी सूचना जारी करून कर्जदार यांना सूचनेत नमूद करण्यात आलेली रकमेची परतफेड सदर सूचना प्राप्तीच्या तारखेच्या **६० दिवसांत** करण्यास सांगितले होते. रकमेची परतफेड करण्यात कर्जदार असमर्थ ठरल्याने, याद्वारे कर्जदार आणि सर्वसामान्य जनतेला सूचना देण्यात येते की, निम्नस्वाक्षरीकारांनी सर्वप्राप्त फिनकेअर प्रायव्हेट लिमिटेडचे प्राधिकृत अधिकारी या नात्याने खाली वर्णन केलेल्या मिळकतीचा कब्जा त्यांना सिक्युरिटी इंटरेस्ट एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ च्या नियम ८ सहवाचता सदर ॲक्टचे कलम १३ चे पोट-कलम (४) अन्वये त्यांना मिळालेल्या प्राप्त अधिकारांचा वापर करून प्रत्येक मिळकतीसमोर नमूद तारखेस घेतला आहे. कर्जदारांचे लक्ष तारण मत्ता विमोचित करण्यासाठी उपलब्ध वेळेच्या संदर्भात अधिनियमाच्या कलम १३ च्या पोट-कलम (८) च्या तरतुदींकडे वेधण्यात येत आहे. विशेषत: कर्जदार आणि सर्वसामान्य जनता यांना याद्वारे सावधान करण्यात येते की, त्यांनी सदरहू मिळकतीच्या देवघेवीचा व्यवहार करू नये आणि सदरहू मिळकतीवरील कोणताही देवघेवीचा व्यवहार हा सर्वग्राम फिनकेअर प्रायव्हेट लिमिटेडच्या खालील उल्लेखित रक्कम आणि त्यावरील व्याजाच्या भाराअधीन राहील.

कर्ज खाते क्रमांक	कर्जदारांचे नाव आणि सह-कर्जदारांचे नाव	मागणी सूचनेची रक्कम आणि तारीख	कब्जाची तारीख	कब्जाची स्थिती
एफएलएसईसी०००३८७६	१. रमेश शंकर डोंबळे २. शालन रमेश डोंबळे ३. रोशन रमेश डोंबळे	रु. २०,५६,९४४.२०/- (रुपये वीस लाख छप्पन्न हजार नऊशे चव्वेचाळीस आणि वीस पैसे फक्त) दिनांक: १४-जुलै-२०२६	०८.१०.२०२६	सांकेतिक कब्जा

परिशिष्ट: मिळकत क्र. १: पोटखराबा सह ०एच ७८ आर ३७ चौ.मी शेअर पैकी पोटखराबा सह एकूण क्षेत्र १० एच ३२ आर ०० एसडब्ल्यू असलेल्या गट क्र. ५३ मध्ये असलेल्या गाव मौजे रावडी खुर्द, तालुका फलटण, जिल्हा सातारा येथे स्थित शेत जमिन मिळकतीचे सर्व ते भाग आणि विभा आणि खालीलप्रमाणे सीमाबध्द: **चतु:सीमा: पूर्वेस:** गट क्र. ५६, **पश्चिमेस:** सरकारी ओढा, **उत्तरेस:** वन रस्ता, **दक्षिणेस:** गट क्र. निरा उजवा कालव